का.प्रा.वि. आयसीडी/१९-२०/६९३

२७/०२/२०२०

# मुंबई विद्यापीठ

03/03/2020

मसुदा
क्र./२०१९—२१

गोपनीय
व्यवस्थापन परिषद

## मुंबई विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेच्या सन २०१९—२० मधील २६ फेब्रुवारी, २०२० च्या बैठकीचे इतिवृत्त.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची सन २०१९—२० मधील अकरावी बैठक **शुक्रवार दिनांक २६ फेब्रुवारी, २०२० रोजी सकाळी ११.३० वाजता व्यवस्थापन परिषदेचे दालन, फोर्ट परिसर, मुंबई—३२** येथे आयोजित करण्यात आली. बैठकीमध्ये खालील मान्यवर सदस्य उपस्थित होते :—

| | | |
|---|---|---|
| १. | प्रा. सुहास पेडणेकर (कुलगुरू) | अध्यक्ष |
| २. | श्री. दिपककुमार मुकादम | सदस्य |
| ३. | प्राचार्य डॉ. राजेश खरात | सदस्य |
| ४. | डॉ. (श्रीमती) रश्मी ओझा | सदस्या |
| ५. | प्राचार्य (डॉ.) अजय भामरे | सदस्य |
| ६. | प्राचार्य (डॉ.) महादाप्पा गोंडा | सदस्य |
| ७. | श्री. रविकांत सांगुर्डे | सदस्य |
| ८. | ॲड. निल हेळेकर | सदस्य |
| ९. | डॉ. सुभाष वाघमारे | सदस्य |
| १०. | श्री. प्रदीप सावंत | सदस्य |
| ११. | श्री. राजन कोळंबेकर | सदस्य |
| १२. | प्रा.बी. एन. जगताप | सदस्य |
| १३. | श्रीमती माधवी इंगोले (वित्त व लेखा अधिकारी) | निमंत्रित |
| १४. | डॉ. अजय देशमुख, कुलसचिव | सदस्य-सचिव |

➢ **अनुपस्थिती :—**

प्रा. वैभव नरवडे आणि डॉ. विनोद पाटील संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ यांनी अनुपस्थिती कळविल्याने त्यांची अनुपस्थिती मंजूर करण्यात आली.

## ➢ स्वागत

कुलसचिव तथा सदस्य सचिवांनी माननीय अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्यांचे बैठकीत स्वागत करून माननीय अध्यक्षांना सभेचे कामकाज सुरू करण्यास अनुमती प्रदान करण्याबाबत विनंती केली.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ३० (ड) अंतर्गत कुलगुरुंनी विद्यापीठ विभाग किंवा विद्यापीठ परिसंस्था यांचे प्रमुख किंवा संचालक या संवर्गातून माननीय श्रीमती **माला लालवाणी** प्रभारी संचालक, (MSEPP) यांचे नामनिर्देशन विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेवर केले आहे. त्यांचे पुस्तक भेट देऊन स्वागत व अभिनंदन करण्यात आले.

## ➢ अभिनंदन

१. श्री. राजन कोळंबेकर यांनी **श्री. प्रदीप सावंत** यांची मुंबई महानगरपालिका को ऑप बॅंकेच्या संचालकपदी निवड झाल्याबदद्ल सभेमध्ये अभिनंदनाचा ठराव मांडला त्याला प्राचार्य डॉ. अजय भामरे यांनी अनुमोदन दिले. सर्वानुमते श्री. प्रदीप सावंत यांचे अभिनंदन करण्यात आले.

## ➢ श्रध्दांजली

**श्री. राजा मयेकर**

सिनेसृष्टीतील ज्येष्ठ रंगकर्मी श्री.राजा मयेकर यांचे अल्पशा आजाराने दिनांक १५ फेब्रुवारी, २०२० रोजी निधन झाले. मृत्यूसमयी ते ९० वर्षाचे होते.

वरील मान्यवराच्या दु:खद निधनाबद्दल शोक व्यक्त करुन २ मिनिटे उभे राहून श्रध्दांजली अर्पण करण्यात आली.

| बाब क्र. | व्यवस्थापन परिषदेची बाब | विभाग |
|---|---|---|
| बाब क्र.१ | अधिसभेमध्ये प्रश्नोत्ताराच्या तासाकरीता प्राप्त उत्तरांचा मसुदा २०१९ चा एकरूप परिनियम क्र.४ कलम ६ (१३) नुसार व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ | कार्यकारी प्राधिकरणे विभाग |
| ठराव | सदर बाबत सविस्तर चर्चा करण्यात आली व सदस्यांनी सुचविलेल्या सूचनांचा उत्तरामध्ये समावेश करुन प्रश्नांची उत्तरे तयार करण्यात आली. अधिसभेत व्यवस्थापन परिषदेत सदस्यांनी खालील नमुद केल्याप्रमाणे प्रश्नांना उत्तरे द्यावीत, असे ठरले. | |

| अ.क्र. | प्रश्न विचारणारे सदस्य | उत्तर देणारे सदस्य |
|---|---|---|
| १. | श्रीमती शिल्पा पटवर्धन | प्राचार्य डॉ. अजय भामरे व<br>प्राचार्य डॉ. राजेश खरात |
| २. | श्री. साहेबराव घुले | ॲड. निल हेळेकर |
| ३. | प्रा. गुलाबराव राजे | प्राचार्य डॉ. महादाप्पा गोंडा |
| ४. | प्रा. वैभव नरवडे | डॉ. रश्मी ओझा |
| ५. | प्रा. प्रकाश दातार | श्री. रविकांत सांगुर्डे |
| ६. | डॉ. निशा मुणी | प्राचार्य डॉ. राजेश खरात |
| ७. | डॉ. धनराज कोहचाडे | श्री. राजन कोळंबेकर |
| ८. | प्रा. रविंद्र रसाळ | डॉ. सुभाष वाघमारे |
| ९. | प्रा. सी.एस. कुलकर्णी | डॉ. रश्मी ओझा |
| १०. | डॉ. सुरेश मैंद | श्री. प्रदीप सावंत |
| ११. | डॉ. आरती प्रसाद | प्राचार्य डॉ. अजय भामरे व<br>प्राचार्य डॉ. राजेश खरात |
| १२. | प्रा. मोहोम्मद ताहीर | ॲड. निल हेळेकर |
| १३. | श्रीमती शितल देवरुखकर | प्राचार्य डॉ. महादाप्पा गोंडा |
| १४. | श्री. मिलिंद साटम | श्री. राजन कोळंबेकर |
| १५. | ॲड. वैभव थोरात | श्री. प्रदीप सावंत |
| १६. | श्री. प्रवीण पाटकर | श्री. रविकांत सांगुर्डे |
| १७. | श्री. सुधाकर तांबोळी प्र.क्र.१<br>प्र.क्र.२<br>प्र.क्र.३ | डॉ. विनोद पाटील<br>वित्त व लेखा अधिकारी<br>कुलसचिव |
| १८. | डॉ. संगिता पवार | प्राचार्य डॉ. राजेश खरात |
| १९. | श्री. रविकांत सांगुर्डे | प्राचार्य डॉ. अजय भामरे |

| | | |
|---|---|---|
| बाब क्र.२ | सन २०१९–२० वित्तीय वर्षासाठी सांविधानिक लेखा परिक्षकाची (Statutory Auditor) नियुक्ती करण्याबाबत. | |
| ठराव | सन २०१९–२० वित्तीय वर्षासाठी विद्यापीठाचे संविधानिक लेखापरीक्षक म्हणून मे. शरद एस्. गायकवाड ॲण्ड कंपनी यांना रु. ६,००,०००/– वार्षिक शुल्क व यापुर्वीच्या अटी व शर्तीसह मुदतवाढ देण्यास मंजुरी देण्यात आली. | |
| बाब क्र.३ | **विद्यापीठाच्या रत्नागिरी उपपरिसर येथे 'जनसंपर्क अधिकारी' हे पद निर्माण करणेबाबत** | आस्थापना विभाग १ / ३ |
| ठराव | मुंबई विद्यापीठाचा विस्तार सात जिल्हयांमध्ये झालेला आहे. त्यामध्ये कोकणातील रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग जिल्हयांचा अंतर्भाव होतो. रत्नागिरी उपपरिसराचे सर्वार्थाने सक्षमीकरण व्हावे, आंबडवे व तळेरे येथे आदर्श महाविद्यालयाचे संचलन सुचारु पध्दतीने व्हावे, तद्वतच कोकणातील विद्यार्थी, शिक्षक, महाविद्यालये व इतर हितसंबंध घटकांसमवेत (Stake Holders) शैक्षणिक व प्रशासकीय सुविधा संदर्भात मुंबई विद्यापीठाचे प्रशासनाच्या अत्यंत सुलभ व जलद गतीने संपर्क व संवाद साधण्याकरीता रत्नागिरी उपपरिसराकरीता 'जनसंपर्क अधिकारी' (१५६००–५४००–३९१००) हे पद निर्माण करुन उपपरिसराचे सक्षमीकरण करणे अत्यंत गरजेचे आहे. याबाबत बैठकीमध्ये विस्तृत चर्चा झाली. चर्चेनुसार रत्नागिरी उपपरिसराकरीता जनसंपर्क अधिकारी (१५६००–५४००–३९१००) हे पद निर्माण करण्याची मान्यता व्यवस्थापन परिषदेने प्रदान केली. तद्वतच विद्यापीठाने निर्माण केलेल्या हया पदास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार मान्यता प्राप्त करण्याकरिता प्रस्ताव मा. शिक्षण संचालकांच्या माध्यामातून शासनकाडे सादर करण्याचे निर्देश देखील व्यवस्थापन परिषदेने दिले. | |
| बाब क्र.४ | **विद्या परिषदेचा दिनांक ३ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या सभेमध्ये पारित केलेला ठराव व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ सादर.** | विद्या विषयक प्राधिकरणे विभाग |
| ठराव | विद्या परिषदेचा दिनांक ३ ऑक्टोबर, २०१९ रोजीच्या सभेमध्ये चर्चेच्या अनुषंगाने मुद्दा क्र.१ अन्वये पारित झालेल्या खालील ठरावास मंजुरी देण्यात आली:— <br><br> Arising out of discussion, resolution made by Dr. Ravindra Deshmukh, Associate Dean, Faculty of Science and Technology at its meeting held on 3rd October, 2019 to amend the O.5090 of title for B.Sc. Science (Aviation) from the academic year 2019-20 be accepted as under and the same be recommended to the Management Council, as per rules (copy enclosed) <br><br> **Existing O.5090 :-** <br> Bachelor of Science (Aviation) <br> **Amended O.5090 :-** <br> Bachelor of Science (Aviation Science) | |



SKS

## चर्चेच्या अनुषंगाने पारीत झालेला ठराव

| | | |
|---|---|---|
| १. | **शासन निर्णय क्र. समय—२०१६/प्र.क्र.६२/१८ (र.व.का) दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०, नुसार विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना ५ दिवसाचा आठवडा लागू करण्यासंदर्भात प्राप्त कर्मचारी संघटनाच्या निवेदना बाबत.** | **आस्थापना विभाग १/३** |
| ठराव | राज्यशासकीय कर्मचाऱ्यांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबतचा शासन निर्णय क्र. समय—२०१६/प्र.क्र.६२/१८ (र.व.का) दिनांक २४ फेब्रुवारी, २०२०, विद्यापीठातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनादेखील लागू करावा असे निवेदन मुंबई विद्यापीठ कर्मचारी संघटनेकडून प्राप्त झाले. तदनुषंगिक निर्णय विद्यापीठ कर्मचाऱ्यांना लागू होतो किंवा कसे याबाबत प्राप्त निवेदनाचा अभ्यास करुन कायदेशीर व तांत्रिक बाबी तपासण्यासाठी समिती गठित करण्यात यावी, असे ठरले. सदर समितीने याबाबतचा अहवाल अत्यंत तातडीने सादर करावा. सदर समिती गठीत करण्याचे व अहवालावर आवश्यक कार्यवाही करण्याचे अधिकार मा. कुलगुरूंना प्रदान करण्यात आले. | |
| समिती | १. Prin.(Dr) Ajay Bhamre (अध्यक्ष)<br>२. Adv. Neel Helekar<br>३. Shri. Pradeep Sawant | |
| २. | विद्यार्थ्यांसाठी ऑनलाईन ट्रान्सक्रीप्शनचा विषय विहीत प्रक्रीया पूर्ण करुन व कागदपत्रांची पुर्तता करुन यानंतरही या बाबत कोणतेही कारण न देता या बाबत निर्णय झाले नाही. एवढया महत्वाच्या विषयावर दिरंगाई होणे हे योग्य नसल्याचे मत श्री. प्रदीप सावंत यांनी व्यक्त केले. यावर तातडीने ही बाब खरेदी समिती समोर पुन:श्च सादर करण्यात येईल, असे मा. कुलगुरुंनी सांगितले. | **विद्यार्थी विकास विभाग आणि वित्त व लेखा विभाग** |
| ३. | आर.के.टी. महाविद्यालयातील अतिरिक्त शिक्षकाला (surplus teacher) प्रभारी प्राचार्य म्हणून कार्यभार देणे उचित नाही, असे मत श्री. रविकांत सांगुर्डे यांनी व्यक्त करुन त्यासंदर्भात संबंधितांना तातडीने कळवावे, अशी मागणी त्यांनी केली. याबाबत योग्य ती कार्यवाही करण्यात येईल, असे मा. कुलगुरुंनी सांगितले. | **शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (म.शि.)** |

| | | |
|---|---|---|
| ४. | के.बी.पी. हिंदुजा महाविद्यालयाच्या प्राचार्यांना विद्यापीठाने मुदतवाढ नाकारल्याचे कळविल्यानंतरही अद्याप पूर्वीचेच प्राचार्य या पदी कायम असणे हे गंभीर असल्याचे श्री. रविकांत सांगुर्डे यांनी परिषदेच्या निदर्शनास आणून दिले व या संदर्भात तातडीने संबंधित महाविद्यालयाच्या व्यवस्थापनास आवश्यक कार्यवाही करण्याबाबत कळवावे अशी मागणी त्यांनी केली. त्यावर या बाबत संबंधित महाविद्यालयास तातडीने पत्र पाठविण्याचे निर्देश मा. कुलगुरुंनी दिले. | **शिक्षक नियुक्ती व मान्यता विभाग (म.शि.)** |

कुलसचिवांनी उपस्थित सर्वांचे आभार मानून मा. अध्यक्षांच्या परवानगीने सभेचे कामकाज संपल्याचे जाहिर केले.

SKSawant 03/03/2020

सहायक कुलसचिव

03/03/2020

कुलसचिव

प्र—कुलगुरू

इतिवृत्त मंजुर

15 OCT 2020

कुलगुरू